पोलीस स्टेशन, वरोरा जि. चंद्रपूर

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** चंद्रपुर **P.S.(ठाणे):** वरोरा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0009 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**05/01/2023 19:25

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 04/01/2023
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 05/01/2023
**Time From (वेळेपासून):** 12:20 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:10 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 05/01/2023 **Time (वेळ):** 18:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 033
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/01/2023 19:25 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंचायत समीती वरोरा येथील ,रुम नं 19 लेखाविभाग, वरोरा,वरोरा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** खेमराज महादेव थुल

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1964

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | देशपांडे पेट्रोलपंपजवळ,महाराणा प्रतापनगर,वरोरा,वरोरा,वरोरा,चंद्रपुर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | देशपांडे पेट्रोलपंपजवळ,महाराणा प्रतापनगर,वरोरा,वरोरा,वरोरा,चंद्रपुर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | आनंद गुरुदास कांबळे | | | 1. 102,हवेली गार्डन,राजनुर रेसिडन्सी,चंद्रपुर,चंद्रपुर,राम नगर,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु. दराच्या 5 नोटा | 2,500.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

2,500.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादि

पो स्टे वरोरा जि.चंद्रपुर

दिनांक:- 05/01/2023

मी श्री. खेमराज महादेव थुल, वय 59 वर्षे, व्यवसाय-सेवानिवृत्त आरोग्य सहायक, प्राथमिक आरोग्य केंद्र सावरी (बिड.), ता.चिमुर जि.चंद्रपूर, रा.महाराणा प्रताप नगर, देशपांडे पेट्रोल पंप जवळ वरोरा ता. वरोरा, जिल्हा चंद्रपूर येथे राहतो. मी पंचायत समिती वरोरा अंर्तगत असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र सावरी (बिड.) येथे आरोग्य सहाय्यक या पदावर नोकरीस होतो. मी दिनांक 31/05/2022 रोजी नियत वयोमानाने सेवानिवृत्त झालेलो असुन सध्या आपले परिवारासह महाराणा प्रताप नगर, देशपांडे पेट्रोल पंप जवळ वरोरा ता. वरोरा, जिल्हा चंद्रपूर येथे राहतो. माझे सेवानिवृत्ती दिनांकाला मुळ सेवा पुस्तकातील अर्जित रजा खाती शिल्लक असलेल्या एकुण 300 दिवस (अक्षरी तिनशे दिवस) अर्जित रजेचे सममुल्य रोख मला प्रदान करण्याकरिता मा. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपुर यांनी त्यांचे कार्यालयीन आदेशान्वये वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र सावरी (बिड.) यांना पत्र देण्यात आले. तसेच त्या पत्राची एक प्रत गट विकास अधिकारी पंचायत समिती वरोरा यांना सादर करण्यात आली. त्यानुसार वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र सावरी (बिड.) यांनी माझे सेवापटात नोंद असल्याप्रमाणे मा. जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प. चंद्रपुर यांचे आदेश क्रमांक/आरोग्य/पेंशन सेल/1826/2022 दि. 21/09/2022 अन्वये 300 दिवस अर्जित रजेचे सममुल्य 6,56,600/- रूपये एवढके रोख प्रदान करण्यास मंजुरी देवुन पंचायत समिती, वरोरा येथे दिनांक 14/12/2022 रोजी बिल मी व माझे मित्र नामे बंडु उमरे यांचेसह पंचायत समिती वरोरा येथे जावुन सादर केले व त्यानंतर सदर बिलाचे काम पाहणारे गै.अ. श्री आनंद कांबळे साहेब, पंचायत समिती वरोरा यांना जावुन भेटलो असता त्यांनी मला अर्जित रजेचे सममुल्य रक्कम 6,56,600/- रूपये काढण्याचे कामाकरीता 4000/-रू ची मागणी केली. तुम्ही जर 4000/-रू दिले नाहीत तर तुमचे काम करणार नाही असे म्हणाल्याने मी नाईलाजास्तव होकार देवुन तेथून निघून आलो.

माझी लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने मी व माझा मित्र श्री. बंडु उमरे यांचेसह दिनांक 03/01/2023 रोजी दुपारी अंदाजे 03/00 वाजता दरम्यान लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर येथील श्री. गुरनुले सा. यांना भेटुन वरील हकीकत सांगितली असता श्री. गुरनुले सा. यांनी सदर बिलाचे संबंधीत मला कागदपत्रे बाबत विचारणा केली असता सदर कागदपत्रे मी घरी असल्याचे सांगितले. त्यावरून श्री गुरनुले साहेब यांनी दिनांक 04/01/2023 रोजी मला मौजा वरोरा येथिल महाकाली नगरी येथिल सुरक्षित स्थळी 11/15 वा दरम्यान सदर बिलाचे कामासंबंधाने सर्व कागदपत्रे घेवुन हजर राहणेबाबत सुचना दिली. त्यावरून मी दिनांक 04/01/2023 रोजी मी व माझा मित्र श्री बंडु उमरे यांचे दुचाकी वाहनाने मौजा वरोरा येथिल महाकाली नगरी मध्ये बिलाचे संबंधीत कागदपत्रे घेवुन हजर आलो. तरी माझा गै.अ.श्री. आनंद कांबळे साहेब, पंचायत समिती वरोरा यांचेशी कोणताही आर्थिक व उसनवारी व्यवहार नाही. लाचरक्कम म्हणुन आवश्यक असलेली रक्कम माझे वैयक्तिक बचतीतुन जमा झालेले 4,000/-रू. आपणाकडे लाचरक्कम म्हणुन वापरण्याकरीता देत आहे. तरी माझे तक्रारीवरुन अर्जित रजेचे सममुल्य रक्कम 6,56,600/- रूपये काढण्याचे कामाकरीता 4,000/-रूपये ची लाच मागणारे गै.अ. श्री आनंद कांबळे साहेब, पंचायत समिती वरोरा यांचेविरुध्द कार्यवाही होणेस श्री. गुरनुले साहेब यांना मी लेखी तक्रार दिली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र गुरनुले साहेब यांनी त्यांचे सोबत हजर असलेल्या दोन्ही पंचाची व स्टॉफची माझे सोबत ओळख करून दिली. श्री. गुरनुले साहेब यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझ्या सहीचा

लेखी तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर सदरच्या लेखी तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी व श्री. गुरनुले साहेब यांनी सुद्धा स्वाक्षरी केली.
त्यानंतर श्री.गुरनुले साहेब यांना मी सापळा कार्यवाहीसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम 4,000/- (रू.500/- दराच्या 08 चलनी नोटा) दिलेल्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रॅसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करून दाखविले. तदनंतर लाचेच्या रकमेस अँथ्रॅसिन पावडर लावली. त्यानंतर श्री. गुरनुले साहेब यांनी दिलेल्या सूचनेवरुन ना.पो.कॉ. संदेश वाघमारे यांनी व्हॉईस रेकॉर्डर कश्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती दिली. त्यानंतर श्री. गुरनुले साहेब यांनी पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि पडताळणी कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. (याबाबत सविस्तर नोंदी पंचनामा क्र 01 मध्ये घेण्यात आल्या).
त्यानंतर श्री. गुरनुले साहेब यांनी पंचासमक्ष गै.अ. श्री आनंद कांबळे साहेब, पंचायत समिती वरोरा यांची लाच मागणी संबंधाने पडताळणी कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यांचे सुचनेवरुन ना.पो.कॉ. संदेश वाघमारे यांनी व्हॉइस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांनी त्यांचे आवाजात पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हॉईस रेकॉर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने माझे गळयात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवून माझेसोबत आलेले माझे मित्र श्री बंडु उमरे यांचे हिरो होंडा पॅशन प्रो दुचाकी वाहन क्र. एम.एच.34-बी.ए. 9258 नी पंच क्र. 01 यांचेसह मला माहीत असलेले गै.अ. श्री आनंद कांबळे साहेब, पंचायत समिती वरोरा यांचेकडे पंचायत समिती वरोरा येथे पडताळणी करीता पाठविले.

पडताळणी दरम्यान गै.अ. श्री आनंद कांबळे साहेब, पंचायत समिती वरोरा यांनी मला ''तुम्ही काही बोलत नाही तिकडे'', '' इकडं तिकडं करून टाकायचं'', ''करून टाकानं, तुम्ही तयारी नाही करत काही नाही'', ''उद्या घेवुन या ..चार सांगितले, तिन देवुन टाका .. मोकळ करून टाका '' त्यांवर गै.अ. श्री आनंद कांबळे यांना ''तिन नं'' ''कमी करा साहेब थोडसं,माझा तब्बेतीले बिब्बेतीले लागले'' असे म्हणालो असता गै.अ. यांनी '' हं कमी केले न आता'', ''बर ठिक आहे आहे अडीच द्या'' असे म्हणुन गै.अ. श्री कांबळे साहेब, पंचायत समिती वरोरा यांनी 4,000/- रूपये ची मागणी करून तडजोडीअंती 2,500 रूपये/- लाचरक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने पडताळणी कार्यवाही करुन परत आलो व पंच क्र. 01 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आले.

त्यानंतर श्री. गुरनुले साहेब यांनी पंच क्र. 01 व 02 यांचेसमक्ष व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले सदर संभाषणाची क्लीप ऐकुण गै.अ. श्री कांबळे साहेब, पंचायत समिती वरोरा यांनी मला माझे अर्जित रजेचे सममुल्य रक्कम 6,56,600/- रुपये काढण्याचे कामाकरीता 4000/-रू. ची मागणी करून तडजोडीअंती 2,500/- रू. स्विकारण्याच्या तयारीत दिसुन आले. तसेच मला गै.अ. श्री कांबळे साहेब, पंचायत समिती वरोरा यांनी '' कॅम्प आहे चंद्रपुरला, उद्या घेवुन या'' असे म्हणुन गै.अ. श्री कांबळे साहेब, पंचायत समिती वरोरा यांनी मला आज दिनांक 05/01/2023 रोजी लाच रक्कम घेवुन बोलाविल्याचे दिसुन आले. त्यावरून गै.अ. श्री कांबळे साहेब, पंचायत समिती वरोरा यांचेविरुध्द आज दिनांक 05/01/2023 रोजी लाचेचा सापळा आयोजनाचा श्री गुरनुले साहेब व दोन्ही पंचांनी निर्णय घेतला.

त्यावरून श्री. गुरनुले सा. यांनी दिनांक 04/01/2023 रोजीची कार्यवाही स्थगित ठेवुन मला पडताळणी कार्यवाही बाबत गोपनियता बाळगण्याचे सुचना देउन गै.अ. श्री कांबळे साहेब, पंचायत समिती वरोरा, यांचेविरूध्द सदर सापळा कार्यवाही हि आज दिनांक 05/01/2023 रोजी करण्यात येणार असल्याचे सांगुन मला आज सकाळी 11/15 वा. वरोरा येथील महाकाली नगरी येथे हजर राहण्यास सांगितले व लाच रक्कम लिफाफा पो.नि. श्री. गुरनुले सा. यांनी आपले ताब्यात ठेवले. (याबाबत सविस्तर नोंदी पंचनामा क्र 02 मध्ये घेण्यात आल्या)

त्यांनतर मी आज दि. 05/01/2023 रोजी मौजा वरोरा येथिल महाकाली नगरी येथिल सुरक्षित स्थळी माझे मित्र श्री बंडु उमरे यांचे दुचाकी वाहनाने आलो असता श्री गुरनुले साहेब हे शासकिय वाहनाने पंच व स्टॉफ सह तेथेच हजर होते. तदनंतर पोनि. गुरनुले साहेब व दोन्ही पंच यांनी श्री कांबळे साहेब, पंचायत समिती वरोरा यांचेविरूद्ध पुढील सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. पंचनामा क्र 2 प्रमाणे मला अँथ्रॅसिन पावडर लावलेली 4,000 /-रूपयांपैकी मला तडजोडीअंती मागणी केली असलेली लाचेची 2,500/-रू रक्कम माझे शर्टाच्या समोरीत बाजुचे डाव्या खिश्यात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन श्री कांबळे साहेब,

पंचायत समिती वरोरा यांनी स्वत: किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर माझे गळ्यातील पांढऱ्या रंगाचा दुपट्टा गळ्यातुन काढुन डाव्या हातात ठेवुन लाचरक्कम दिल्याबाबतचा ईशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले.

त्यानंतर श्री. गुरनुले साहेब यांचे सुचनेवरुन नापोकॉ. संदेश वाघमारे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांचे आवाजात सापळा कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हाईस रेकॉर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने माझे गळ्यात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवून मला माझेसोबत आलेले श्री बंडु उमरे यांचे हिरो होंडा पॅशन प्रो दुचाकी वाहन क्र. एम.एच.34-बी.ए. 9258 नी पंच क्र. 01 यांचेसह पंचायत समिती वरोरा, ता.वरोरा जि.चंद्रपूर येथे जाण्यास रवाना केले व सापळा पथकातील सदस्य माझे मागोमाग शासकिय वाहनाने आले. त्यानंतर मी व पंच क्र. 01 पंचायत समिती वरोरा येथे गेलो असता त्या ठिकाणी गै.अ. श्री कांबळे साहेब, पंचायत समिती वरोरा हे पंचायत समिती वरोरा येथिल रूम नं 19, लेखा विभाग येथे हजर होते. त्यांचेशी बोलणी दरम्यान गै.अ. श्री कांबळे साहेब, पंचायत समिती वरोरा यांनी मला इशाऱ्याने रूमबाहेर बोलावुन पंचायत समिती वरोरा येथिल रूम नं 19, लेखा विभाग समोरील रूम नं 17 स्वच्छता गृहासमोर नेवुन तिथे माझेकडुन 2,500/- रूपये लाच रक्कम आपले हातात घेवुन ''अडीच, ठीक आहे.'' असे म्हणुन पुर्ण रूपये मोजुन घेतले व मला ''ठिक आहे या'' असे म्हणुन घेतलेली लाच रक्कम 2,500/- रूपये आपले पॅन्टचे डाव्या बाजुचे मागील खिश्यात ठेवले. त्यानंतर मी त्यांना कामाबद्दल ''आता नाही होईल'' असे विचारले असता गै.अ. कांबळे यांनी ''बिडीओ साहेबांसोबत मिटींग आहे, तिकडुन आल्यावर करतो हं'' असे म्हणाले.

त्यानंतर मी पंचायत समिती वरोरा कार्यालयाच्या बाहेर येवुन सापळा पथकास माझे गळ्यातील पांढऱ्या रंगाचा दुपट्टा गळ्यातुन काढुन डाव्या हातात ठेवुन गै.अ. श्री कांबळे साहेब, पंचायत समिती वरोरा यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने गै.अ. श्री कांबळे साहेब, पंचायत समिती वरोरा यांना त्यांचे लेखाविभाग रूम नं. 19 मध्ये जावून रंगेहात पकडुन पुढील कारवाई केली. (याबाबत सविस्तर नोंदी पंचनामा क्र 03 मध्ये घेण्यात आल्या)

तरी आनदं गुरूदास कांबळे, सहाय्यक लेखा अधिकारी, पंचायत समिती वरोरा, ता. वरोरा जि.चंद्रपुर (वर्ग-3) यांनी आपल्या पदाचा दुरूपयोग करून मला माझे अर्जित रजेचे सममुल्य रक्कम 6,56,600/- रूपये काढण्याचे कामाकरीता 4,000/-रूपये ची लाचेची मागणी करून तडजोडीअंती 2,500/-रूपये लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी करून माझेकडुन लाचेची रक्कम 2,500/-रु. स्विकारली. म्हणुन माझी त्यांच्याविरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यानुसार कार्यवाही होणेकरीता कायदेशीर फिर्याद देत आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

DIPAK SOVINDA KHOBRAGADE(I (Inspector)) / BOBN73119 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

K.M. Thod.

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): DIPAK SOVINDA KHC
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN73119

HC/288
प्रथम खबरी दाखल अधिकारी
पोलीस स्टेशन यरौरा

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| **S.No.**(अ.क्र.) | **Sex** (लिंग) | **Date/Year of Birth** (जन्म तारीक/ वर्ष) | **Build** (बांधा) | **Height (cms.)** (उंची(सें. मी.)) | **Complexion** (रंग) | **Identification Mark (s)** (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| **Deformities/ Peculiarities** | **Teeth** (दात) | **Hair** (केस) | **Eyes** (डोळे) | **Habit(s)** (सवयी) | **Dress Habit(s)** (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| **Language /Dialect** (भाषा / बोलीभाषा) | **Place Of** (का स्थान) | | | | | **Others** (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Burn Mark** (भाजल्याच्या खुणा) | **Leucoderma** (कोड) | **Mole** (तिळ) | **Scar** (व्रण) | **Tattoo** (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)